व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व त्याअंतर्गत असलेल्या कार्यालयामधील योजनेतर मंजूर १७४४ अस्थायी पदे दि. ०१.१०.२०१७ पासून दि. ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास मंजूरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,

शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०१७/प्र.क्र.५६/व्यशि-३,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१७.

पहा : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.असंक-१००४/प्र.क्र.१२(भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि. ४.१०.२००४.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.आयटीआय-१००४/(२४७/०४)/ व्यशि-२, दि. ३०.९.२००६.

३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१७/ प्र.क्र. ५६/व्यशि-३, दि. ०७.०३.२०१७

४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र. ०८/आ.पु.क., दि. ०३.१०.२०१७ व दि. १७.१०.२०१७ चे शुध्दीपत्रक.

५) संचालक, व्यवसाय व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र. ११/आस्था-३/मुदतवाढ/२०१७/(१६/१७)/१२३५, दि. १६.१०.२०१७.

प्रस्तावना :-

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अधिपत्याखालील ०६ प्रादेशिक कार्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्रगत व्यवसाय प्रशिक्षण पध्दती, यंत्र दुरुस्ती व देखभाल पथक, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, शासकीय औद्योगिक कर्मशाळा व तत्सम केंद्र, औद्योगिक कामगारांसाठी सायंकालीन वर्ग, हायटेक प्रशिक्षण योजना यामध्ये मंजूर १४९६३ पदांपैकी ९८९६ पदे स्थायी व ३३२३ पदे अस्थायी आहेत. त्यापैकी पदांच्या आढाव्याअंती १७४४ योजनेतर अस्थायी पदे मंजूर आहेत. वित्त विभागाच्या संदर्भीय (१) येथील शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार वरील संदर्भ क्र. (३) अन्वये सदर १७४४ अस्थायी पदांना दिनांक ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. वित्त विभागाच्या संदर्भाधिन (४) येथील शासन निर्णयान्वये दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत. त्यास अनुलक्षून संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय (५) येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार दिनांक ०१.०३.२०१७ ते ३०.०९.२०१७ पर्यंत अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अधिपत्याखालील ०६ प्रादेशिक कार्यालये, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्रगत व्यवसाय प्रशिक्षण पध्दती, यंत्र दुरुस्ती व देखभाल पथक, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र,शासकीय औद्योगिक कर्मशाळा व तत्सम केंद्र, औद्योगिक कामगारांसाठी सायंकालीन वर्ग, हायटेक प्रशिक्षण योजना यामधील सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविल्याप्रमाणे १७४४ योजनेतर अस्थायी पदांना दिनांक ०१.१०.२०१७ पासून दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यास पुढील अटी व शर्तीस अधिन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यांत येत आहे. पदांचा संवर्गनिहाय तपशिल **प्रपत्र-१** मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

अटी व शर्ती :-

१) उपरोक्त पदे ज्या प्रयोजनासाठी निर्माण करण्यांत आली, त्याच प्रयोजनासाठी पुढे चालू ठेवण्यात यावीत. चालू ठेवण्यात आलेल्या अस्थायी पदांवरील कर्मचारी नियमानुसार मिळणारे वेतन भत्ते इत्यादी मिळण्यास पात्र समजण्यात यावेत.

२) मुदतवाढ दिलेल्या पदांपैकी कोणतेही पद ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त नाही याची खात्री करून घेण्यात यावी.

३) सदर कालावधीमध्ये मंजूर पदांच्या आढाव्यास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेतलेली आहे. तथापि, त्यानंतर पदनिर्मिती मंजूर झालेली आहे. अशा प्रकरणी नवनिर्मिती पदांच्या समवेक्षनासह पदांच्या आकृतीबंधास मान्यता घेण्याची कार्यवाही विहित कालावधी पूर्ण करावी.

४) पदांचा आढावा घेवून सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास मुदतवाढीअभावी सदर अस्थायी पदांच्या वेतनाचा प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची राहील. या कालावधीनंतर आकृतीबंध निश्चित करण्यासाठी कालावधी वाढवून देण्यात येणार नसल्याची कृपया नोंद घ्यावी.

२. या प्रस्तावावर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली मंजूर होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

१) " मागणी क्रमांक झेडए-१, २२३० - कामगार व सेवायोजन, ०३ - प्रशिक्षण, (०२)-कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, (०२)(०१)- कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण, (२२३० ए ०३१)"

२) " मागणी क्रमांक झेडए-१, २२३० - कामगार व सेवायोजन, १०२ - शिकाऊ उमेदवारांचे प्रशिक्षण, (०१) शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण, (०१) (०१) शिकाऊ उमेदवारांबाबत अधिनियम १९६१ अन्वये शिकाऊ उमेदवारांचे प्रशिक्षण (२२३० ए ०४९)"

३) "मागणी क्रमांक झेडए-१, २२३० - कामगार व सेवायोजन, ०३- प्रशिक्षण, ००३- कारागिर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण, (०१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण कार्यशाळा, (०१) (०१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण कार्यशाळा (२२३० ए ०५८)"

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: पदनि २०१६/ प्र.क्र.०८/ आ.पु.क., दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ व १७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०३११४५४४७८६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2017.11.01 11:34:29 +05'30'

(स.दि.खरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर. (संचालनालयामार्फत).
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)
८. सर्व प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संचालनालयामार्फत)
९. सर्व अंशकालीन प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (संचालनालयामार्फत)
१०. सर्व प्राचार्य, प्रगत व्यवसाय प्रशिक्षण पध्दती (संचालकांमार्फत).
११. यंत्र निगराणी कार्यशाळा पथक द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल/अमरावती (संचालनालयामार्फत)
१२. सर्व शासकीय औद्योगिक कार्यशाळा व तत्सम केंद्र (संचालनालयामार्फत)
१३. हायटेक प्रशिक्षण योजना, पुणे (संचालकांमार्फत).
१४. सर्व अंशकालीन प्राचार्य, औद्योगिक कामगारांसाठी संवर्ग (संचालनालयामार्फत)
१५. अवर सचिव (व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. अवर सचिव (का. १४७१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. अवर सचिव / कार्यासन अधिकारी (व्यशि-१/व्यशि-२/व्यशि-५/रोस्वरो-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (व्यशि-३), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

परिशिष्ट - १

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-२०१७/प्र.क्र. ५६/व्यशि-३,
दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०१७ अन्वये
२२३० - कामगार व सेवायोजन या मुख्य लेखाशिर्षांतर्गत मंजूर योजनेतर अस्थायी पदे
दि. ०१.१०.२०१७ पासून दि. ३१.१२.२०१७ पर्यंत चालू ठेवण्याबाबत अस्थायी पदांचा तपशिल
दर्शविणारे विवरणपत्र

अ.क्र.	वर्ग	मुदतवाढ देण्यात आलेल्या अस्थायी पदांची संख्या
१	वर्ग-१	७
२	वर्ग-१ (क)	२०
३	वर्ग-२	४५
४	वर्ग-३	१०६३
५	वर्ग-४	२४४
६	अंशकालीन/ठोक वेतन/ठेका पद्धती	३६५
	एकूण	**१७४४**

प्रपत्र -१

२२३० - कामगार व सेवायोजन या मुख्य लेखाशिर्षांतर्गत मंजूर १७४४ अस्थायी पदांना दि.०१.१०.२०१७ पासून ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेल्या योजनेतर अस्थायी पदांचा तपशिल

पदनाम	६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी		मुदतवाढ देण्यात आलेली योजनेतर अस्थायी पदे
	वेतन बँड	ग्रेड वेतन	
सहाय्यक संचालक (तांत्रिक)	१५६००-३९१००	६६००	३
प्राचार्य	१५६००-३९१००	६६००	४
वर्ग-१			**७**
निरीक्षक	१५६००-३९१००	५४००	४
प्राचार्य	१५६००-३९१००	५४००	११
उपप्राचार्य	१५६००-३९१००	५४००	५
वर्ग-१ (क)			**२०**
सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)	९३००-३४८००	४८००	९
प्राचार्य	९३००-३४८००	४८००	२७
उपप्राचार्य	९३००-३४८००	४८००	४
प्रबंधक	९३००-३४८००	४८००	५
वर्ग-२			**४५**
गट निदेशक	९३००-३४८०० --"--	४४०० ४६००-व.श्रेणी	४४
शिल्प निदेशक	९३००-३४८०० --"-- --"--	४३०० ४४००-वरिष्ठ श्रेणी ४८००-निवड श्रेणी	५९२
व्यवसाय निदेशक	९३००-३४८०० --"-- --"--	४३०० ४४००-वरिष्ठ श्रेणी ४८००-निवड श्रेणी	१४
गणित निदेशक	९३००-३४८०० --"-- --"--	४३०० ४४००-वरिष्ठ श्रेणी ४८००-निवड श्रेणी	२८
चित्रकला निदेशक	९३००-३४८०० --"-- --"--	४३०० ४४००-वरिष्ठ श्रेणी ४८००-निवड श्रेणी	२५
मास्टर क्राफ़्टस्मन	९३००-३४८००	४३००	२
निदेशक (जी.आय.टी.)	५२००-२०२०० ९३००-३४८०० --"--	२८०० ४२००-वरिष्ठ श्रेणी ४३००-निवड श्रेणी	९
कनिष्ठ क्राफ़्टस्मन	५२००-२०२००	२४००	१
कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तां)	९३००-३४८०० --"--	४४०० ४८००-व.श्रेणी	११
कार्यालय अधिक्षक	९३००-३४८००	४३००	१२
अधिक्षक(तांत्रिक)	९३००-३४८००	४३००	४

पदनाम	६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी		मुदतवाढ देण्यात आलेली योजनेतर अस्थायी पदे
	वेतन बँड	ग्रेड वेतन	
भांडार अधिक्षक	९३००-३४८००	४३००	२
कॉम्प्युटर प्रोग्रॅमर	९३००-३४८००	४३००	१
मुख्य लिपिक/प्रमुख लिपिक	९३००-३४८००	४२००	२१
मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (मेकॅ./इले./इलेक्ट्रॉ.)	५२००-२०२००	२८००	१७
वसतिगृह अधिक्षक-तथा-ग्रंथपाल-शा.शिक्षण निदेशक	५२००-२०२००	२८००	१
भांडारपाल	५२००-२०२००	२८००	११
वरिष्ठ लिपिक/लेखापाल	५२००-२०२००	२४००	११०
लघुटंकलेखक	५२००-२०२००	२४००	२
कनिष्ठ लिपिक/कनिष्ठ लिपिक-टंकलेखक/लिपिक-टंकलेखक	५२००-२०२००	१९००	११०
कनिष्ठ तथा भांडार लिपिक	५२००-२०२००	१९००	१९
सहाय्यक भांडारपाल	५२००-२०२००	१९००	२७
वर्ग-३ (शिक्षकीय व शिक्षकेतर)			**१०६३**
शिपाई	४४४०-७४४०	१३००	३४
चतुर्थश्रेणी कर्मचारी	४४४०-७४४०	१३००	२०९
कार्यशाळा परिचर	४४४०-७४४०	१३००	१
वर्ग-४			**२४४**
नियमित वेतनश्रेणीतील मंजूर पदे			**१३७९**
पहारेकरी	ठेका पध्दती		२४५
सफाईगार	ठेका पध्दती		८९
अंशकालीन प्राचार्य	रु.१५०/- दरमहा		११
निदेशक (थिअरी)	रु.१००/- दरमहा		३
निदेशक (प्रॅक्टिकल)	रु.१००/- दरमहा		९
निदेशक (गणित)	रु.१००/- दरमहा		२
निदेशक (ड्रॉईंग)	रु.१००/- दरमहा		२
लिपिक/टंकलेखक	रु.५०/- दरमहा		२
शिपाई	रु.३५/- दरमहा		२
ठोक वेतनावर/ठेका पध्दतीने मंजूर पदे			**३६५**
एकूण			**१७४४**

Sakharam Dina Kharat

(स.दि.खरात)

उप सचिव, महाराष्ट्र शासन